# ३६१४ मतदारांचे दुहेरी मतदान?

## ‘अकोला पश्चिम’च्या निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अकोला :** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीत मतदारांनी दुहेरी मतदान केल्याचा आरोप करून काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांच्या निवडीला भाजप नेते तथा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. मतदार यादीला न्यायालयात आव्हान देता येत नसल्याचा प्रतिवाद्यांचा अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळला. एकाच मतदारांनी दोन वेगवेगळ्या मतदारसंघात मतदान केल्याप्रकरणी याचिका असून हा मुद्दा कायद्याने प्रतिबंधित नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक झाली. या निवडणुकीत काँग्रेसचे साजिद खान पठाण यांनी भाजपच्या विजय अग्रवाल यांच्यावर निसटता विजय मिळवला. याप्रकरणी विजय कमलकिशोर अग्रवाल यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेऊन निवडीला आव्हान दिले.

निवडणुकीच्या दिवशी तीन हजार ६१४ मतदारांनी दुहेरी मतदान केल्याचा दावा याचिकेमध्ये करण्यात आला आहे. यामध्ये एक हजार ११५ मतदारांची नावे एकाच वेळी अकोला पश्चिम आणि बाळापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत होती. त्यांनी दोन्ही ठिकाणी मतदान केले. अकोला पश्चिममध्ये त्या मतदारांनी साजिद खान पठाण यांच्या बाजूने मतदान केले.

यामुळे लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ६२ (३) आणि ६२ (४) नुसार ही निवडणूक अवैध ठरते, असा युक्तिवाद याचिकाकर्तांकडून ॲड. रोहन मालवीय यांनी न्यायालयात केला.

प्रतिवादीकडून ॲड. जे.टी. गिल्डा यांनी याचिकेवर आक्षेप घेतला. निवडणूक याचिकेद्वारे मतदार यादीला आव्हान देता येत नाही. त्यामुळे हा मुद्दा कायद्याने चालत नाही, असा अर्ज न्यायालयात सादर केला. याचिकाकर्त्यांनी मतदार यादीला आव्हान दिलेले नाही.

एकाच व्यक्तीने दोन वेगवेगळ्या मतदारसंघात मतदान केल्याच्या मुद्द्यावर भर दिला. तो कायद्याने प्रतिबंधित नाही, असे न्यायमूर्ती अनिल एल. पानसारे यांनी स्पष्ट करून प्रतिवाद्यांचा अर्ज फेटाळून लावला. पुढील सुनावणी ३१ जुलै रोजी होणार आहे.

# निवडणूक कामात हलगर्जीपणा; ‘बीएलओ’ विरुद्ध फौजदारी गुन्हा

**अमरावती :** भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात दिलेले शासकीय कर्तव्य पार पाडण्यात जाणीवपूर्वक निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केल्याप्रकरणी धारणी तालुक्यातील चोपन येथील मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) सुनील काळे यांच्याविरुद्ध धारणी पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल केला.

विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक आयोगाच्या कालबद्ध अशा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारांना गणना पत्रकांचे वाटप करून ते परिपूर्ण भरून घेत त्यांचे संगणकीकरण करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी संबंधित बीएलओ यांच्यावर सोपवण्यात आली होती. सुनील काळे यांनी या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या शासकीय कामात वारंवार हलगर्जीपणा व दुर्लक्ष केले. त्यांच्याकडून केवळ एक टक्क्यापेक्षा कमी गणना पत्रकांचे वाटप झाले असून एकही पत्रक संगणकीकृत करण्यात आले नव्हते. पर्यवेक्षक तथा जलसंधारण अधिकारी जयंत शिरभाते यांनी या कामाचा दैनंदिन आढावा घेताना ही गंभीर अनियमितता लक्षात आली. सुनील काळे यांनी पर्यवेक्षकांच्या सूचनांचे पालन न करणे, फोन व व्हॉट्सॲप संदेशांना प्रतिसाद न देणे आणि शासकीय दस्तऐवज अनाधिकृतरित्या स्वतःच्या ताब्यात ठेवल्याचे समोर आले. याप्रकरणी मतदार नोंदणी अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार धारणी यांच्यामार्फत बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसलाही कोणतेही उत्तर दिले नाही. निवडणूक कार्यात जाणीवपूर्वक खोळंबा निर्माण केल्याने, मतदार नोंदणी अधिकारी मेळघाट यांच्या आदेशान्वये पर्यवेक्षक जयंत शिरभाते यांनी धारणी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली. या तक्रारीवरून सुनील काळे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

# प्रदूषणाची उच्चस्तरीय चौकशी करा - चोखारे

चंद्रपूर : एमआयडीसी ताडाळी येथील विमला सायडिंगमध्ये कथित निकृष्ट दर्जाच्या अथवा भेसळयुक्त कोळशाची हाताळणी, वाढते वायू व धूळ प्रदूषण, पर्यावरणीय नियमांचे संभाव्य उल्लंघन, आवश्यक वृक्षलागवडीचा अभाव आणि परिसरातील शेतीचे होत असलेले नुकसान या गंभीर मुद्द्यांची उच्चस्तरीय, निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे कामगार नेते तथा चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दिनेश दादापाटील चोखारे यांनी राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनाची दखल घेत संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून वस्तुस्थितीची पडताळणी करण्यात येईल आणि आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन मंत्री मुंडे यांनी दिल्याचे चोखारे यांनी सांगितले.

# रेनायसन्सच्या रोजगार मेळाव्यात १४१ विद्यार्थ्यांना नोकरी




**चंद्रपूर :** रेनायसन्स ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये आयोजित इंडस्ट्री-अकॅडमिया मीटअंतर्गत रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ३३ नामांकित कंपन्यांच्या सहभागातून पार पडलेल्या या मेळाव्यात विविध शाखांतील १४१ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली.

या रोजगार मेळाव्यात टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स, केआरडीसी इंटरनॅशनल लिमिटेड, सीएट टायर्स, हिताची इंडिया, महिंद्रा लॉजिस्टिक्स, दिनशॉज आदी आघाडीच्या कंपन्यांनी सहभाग नोंदविला. एकूण ८३५ उमेदवारांनी नोंदणी केली होती.

त्यामध्ये पॉलिटेक्निकचे ४१०, बीबीए-एमबीएचे ३८० आणि आयटीआयचे ४५ उमेदवार सहभागी झाले होते. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी इंडस्ट्री-अकॅडमिया मीटचे अध्यक्षस्थान भूषवले. विद्यार्थ्यांनी रोजगारक्षम कौशल्यांचा सातत्याने विकास करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. रेनायसन्स ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे संचालक डॉ. जी. एफ. सुर्या यांनी कौशल्य विकास, आत्मविश्वास आणि उद्योगाभिमुख दृष्टीकोन यशस्वी करिअरसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. एन. एम. पुगलिया ट्रस्टचे अध्यक्ष नितीन पुगलिया यांनी विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञानासोबत संवादकौशल्य, शिस्त आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. या रोजगार मेळाव्याचे समन्वय युता फाउंडेशन, नागपूरचे अध्यक्ष कुणाल पडोळे यांनी केले. संस्थेच्या वतीने ऋषी काल्डा, मिथुन काटकर आणि विवेक जोगी यांनी नियोजनाची जबाबदारी सांभाळली. रेनायसन्स पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. जे. एस. त्रिपाठी यांनी आभार मानले.

# ...तर शेतकऱ्यांसाठी आमदारकीचा राजीनामा-पिंपळे

**अकोला :** सदोष बियाणे प्रकरणात कृषी विभागाच्या गैरकारभारावर मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे यांनी जोरदार ताशेरे ओढले. भाजपचा आमदार असलो तरी शेतकऱ्यांनीच निवडून दिले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर व्यापक आंदोलन उभे करेल, वेळ पडली आमदारकीचा देखील राजीनामा देईल, असे वक्तव्य भाजप आमदार हरीश पिंपळे यांनी करून तीव्र संताप व्यक्त केला.

बैठकीमध्ये कृषी विभागाच्या गैरकारभारावरून पिंपळे यांनी संतप्त होत अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. ते म्हणाले, ‘शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर फसवणुकीचा गुन्हा का दाखल करण्यात आला नाही? शेतकऱ्यांच्या हितासाठी तुमची नियुक्ती केली आहे. शेतकऱ्यांना सुविधा मिळाव्या, दर्जेदार बियाणे, खत मिळाले पाहिजे. त्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे.

**बँक ऑफ इंडिया**
नातं बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vidarbha@bankofindia.bank.in

**सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना**

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषत: खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लेटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

**ई-लिलावाची तारीख आणि वेळ : 11/08/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत**

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सदर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती ARD.Vidarbha@bankofindia.bank.in या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री स्वप्नील अग्रवाल मो.8888334383, श्री शुभम मस्के मो. 8237771144 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

| कर्जदार, सह-कर्जदार, प्रोपायटर गहाणदार, जमानतदाराचे नांव, शाखेचे नाव, मालमत्ता आयडी | संपत्तीचे विवरण | एकुण थकबाकी | ताबा प्रकार | नवीन लिलावाची सुरुवातीची किंमत रु. | अनामत रक्कम (ईएमडी) रु. |
|---|---|---|---|---|---|
| कर्जदार/गहाणदार : श्री मंसुर खा मोहम्मद खा<br>जमानतदार : श्री मोहम्मद सलमान जावेद इकबाल<br>BKIDAKO164<br>शाखा : अकोला | संपतीचा सर्व भाग व तुकडा निवासीय फ्लॅट/ प्रापर्टी फ्लॅट नं.402, चवथा माळा, नुर रेसिडेंसी, सर्व्हे नं.44/1, 44/2 व 44/3, प्लॉट नं. 81, मौजा अकोली खुर्द, तह. व जि. अकोला, फ्लॅट चा अंदाजे आराजी 79.46 स्के.मि. श्री मंसुर खा मोहम्मद खा यांच्या नावाने. | रू. 19.15 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 9,00,000/- | रु. 90,000/- |
| कर्जदार/गहाणदार : श्री इमरान शेरजामा खान<br>जमानतदार : श्री सोहेल अहमद इकबाल अंसारी<br>श्रीमती साझीया फिरदोस मोहम्मद अली खान पठाण<br>BKIDBUDL04<br>शाखा : बुलढाणा | जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, शेड आणि स्ट्रक्चर्स मध्ये फ्लॅट नं.101, तळ माळा, तमन्ना विल्ला, प्लॉट नं. 95 (ए), सर्व्हे नं.74, मिर्झानगर,जामा मसिज्द जवळ, अतरी लेआऊट, मौजा बुलढाणा, तह. आणि जि.बुलढाणा, अंदाजे आराजी 1210.50 (एकुण प्लॉट एरिया), 392.90 स्के.फीट, (बिल्टअप) श्री इमरान शेरजामा खान (कर्जदार/ गहाणदार) यांच्या नावाने. | रू. 15.78 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | सांकेतिक | रु. 9,83,000/- | रु. 98,300/- |
| कर्जदार : श्री शेख फारुक शेख करीम<br>सहकर्जदार : श्रीमती करीम वाहीदा फिरदोस शेख फारुक<br>जमानतदार : श्री रशिद अहमद मो.हुसैन<br>BKIDGOR40 | जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, शेड आणि स्ट्रक्चर्स मध्ये निवासीय फ्लॅट नं.02, तळ माळा, अरकम रेसिडेंसी, प्लॉट नं.51 बी (भाग) 52, 53, 54, सर्व्हे नं.44/2, मौजा आकोली खुर्द, आनंद वाटीका च्या मागे, वाशिम बायपास रोड, मिल्लतनगर, डोंगरे लेआऊट, अकोला, तह. आणि जि.अकोला-444001 श्री शेख फारुक शेख करीम (कर्जदार- गहाणदार) यांच्या नावाने. | रू. 13.64 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 9,43,000/- | रु. 94,300/- |
| कर्जदार/गहाणदार : मे.कस्तुरी फुड प्रॉडक्ट<br>प्रो.श्री प्रकाश शामराव खोब्रागडे<br>BKIDNAGKASTURI<br>शाखा : नागभिड | जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि औद्योगिक जमीनवर बांधलेले सर्व बिल्डींग, फिक्चर्स, शेड आणि स्ट्रक्चर्स मध्ये प्लॉट नं. ए-23, सर्व्हे नं.138, 139/1, 139/2, 140, 146/1, 146/2, 149/1, 149/2, 150 मिनी इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशन नागभिड, मौजा नवखला, तह.नागभिड, जि.चंद्रपूर, अंदाजे आराजी 10764 स्के.फीट (प्लॉट), 2583.36 स्के.फीट (बिल्टअप) श्री प्रकाश शामराव खोब्रागडे (कर्जदार/गहाणदार) यांच्या नावाने. | रू. 22.49 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | सांकेतिक | रु. 31,36,000/- | रु. 3,13,600/- |
| कर्जदार/गहाणदार : श्री सय्यद अफरोझ सय्यद बशिर<br>सह-कर्जदार : श्रीमती शेहनाज खातुम सय्यद अफरोझ<br>जमानतदार: श्री शेख समीर शेख अमीर<br>BKIDVIDBUL01<br>शाखा : बुलढाणा | जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, शेड आणि स्ट्रक्चर्स मध्ये फ्लॅट नं.ए-09, तिसरा माळा, सलेहा अपार्टमेंट,प्लॉट नं.21, सर्व्हे नं.74, मिर्झानगर, तकवा मस्जिद जवळ, अतवारी लेआऊट, मौजा बुलढाणा तह. आणि जि. बुलढाणा अंदाजे आराजी 833.00 स्के.फीट (बिल्टअप) श्री सय्यद अफरोझ सय्यद बशिर (कर्जदार/गहाणदार) यांच्या नावाने. | रू. 06.65 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | सांकेतिक | रु. 14,47,000/- | रु. 1,44,700/- |
| # कर्जदार/गहाणदार/लाभार्थी : श्री राजु हनुमान वासेकर<br>श्रीमती जया राजु वासेकर<br>शाखा : बाबुपेठ<br>प्रापर्टी आयडी : BKIDBABURAJU | जागेचा सर्व भाग आणि तुकडा मध्ये जागा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस, फिक्चर्स उभारलेले आणि स्थापित केलेले निवासीय टेनेमेंट नं. (इ-103) /103, बिल्डींग नं.ई 1, पहीला माळा, म्हाडा अपार्टमेंट, ऑटो कॉलोनी, गुरु साई पॉलीटेक्नीक जवळ, टेनेमेंटस 100/168 येथे स्थित ईडब्लुएस म्हाडा स्कीम, सर्व्हे नं.328/1, 329/1, 330/1-ए, मौजा दाताळा, साईट नं.124, तह. आणि जि.चंद्रपूर, म्हाडा कडून श्री राजु हनुमान वासेकर (कर्जदार/ गहाणदार/लाभार्थी) आणि श्रीमती जया राजु वासेकर (कर्जदार/गहाणदार/लाभार्थी) यांना वाटप केलेली जमीन, बिल्ट अप एरिया 44.74 स्के.मि., कारपेट एरिया 38.02 स्के.मि. | रू. 05.71 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 5,94,000/- | रु. 59,400/- |
| # कर्जदार/गहाणदार/लाभार्थी : श्री विशाल अशोक खैरकर<br>श्रीमती हर्षलता विशाल खैरकर<br>शाखा : बाबुपेठ<br>प्रापर्टी आयडी : BKIDBABUVISHAL | जागेचा सर्व भाग आणि तुकडा मध्ये जागा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस्, फिक्चर्स उभारलेले आणि स्थापित केलेले निवासीय टेनेमेंट नं. (सी-305) /305, बिल्डींग नं.सी 2, तिसरा माळा, म्हाडा अपार्टमेंट, ऑटो कॉलोनी, गुरु साई पॉलीटेक्नीक जवळ, टेनेमेंटस 100/168 येथे स्थित ईडब्लुएस म्हाडा स्कीम, सर्व्हे नं.328/1, 329/1, 330/1-ए, मौजा दाताळा,साईट नं.124, तह. आणि जि.चंद्रपूर, म्हाडा कडून श्री विशाल अशोक खैरकर (कर्जदार/ गहाणदार/लाभार्थी) आणि श्रीमती हर्षलता विशाल खैरकर (कर्जदार/गहाणदार/ लाभार्थी) यांना वाटप केलेली जमीन,बिल्ट अप एरिया 44.74 स्के.मि., कारपेट एरिया 38.02 स्के.मि. | रू. 5.79 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 5,94,000/- | रु. 59,400/- |
| # कर्जदार/गहाणदार/लाभार्थी : श्री रमेश बापुराव वाजे<br>श्रीमती करुणा रमेश वाजे<br>शाखा : जटपुरा गेट<br>प्रापर्टी आयडी : BKIDJGRAMESH | जागेचा सर्व भाग आणि तुकडा मध्ये जागा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस्, फिक्चर्स उभारलेले आणि स्थापित केलेले निवासीय टेनेमेंट नं. (ई-104) /104, बिल्डींग नं.डी 1, पहीला माळा, म्हाडा अपार्टमेंट, ऑटो कॉलोनी, गुरु साई पॉलीटेक्नीक जवळ, टेनेमेंटस 100/168 येथे स्थित ईडब्लुएस म्हाडा स्कीम, सर्व्हे नं.328/1, 329/1, 330/1-ए, मौजा दाताळा, साईट नं.124, तह. आणि जि.चंद्रपूर, म्हाडा कडून श्री रमेश बापुराव वाजे (कर्जदार/ गहाणदार/ लाभार्थी) आणि श्रीमती करुणा रमेश वाजे (कर्जदार/ गहाणदार/लाभार्थी) यांना वाटप केलेली जमीन, बिल्ट अप एरिया 44.74 स्के.मि., कारपेट एरिया 38.02 स्के.मि. | रू. 5.71 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 5,94,000/- | रु. 59,400/- |
| # कर्जदार/गहाणदार/लाभार्थी : श्री असलम खान मोहम्मद खान पठाण<br>श्रीमती आसमा असलम खान पठाण<br>शाखा : जटपुरा गेट<br>प्रापर्टी आयडी : BKIDJGASLAM | जागेचा सर्व भाग आणि तुकडा मध्ये जागा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस्, फिक्चर्स उभारलेले आणि स्थापित केलेले निवासीय टेनेमेंट नं. (ई-307) /307, बिल्डींग नं.ई 2, तिसरा माळा, म्हाडा अपार्टमेंट, ऑटो कॉलोनी, गुरु साई पॉलीटेक्नीक जवळ, टेनेमेंटस 100/168 येथे स्थित ईडब्लुएस म्हाडा स्कीम, सर्व्हे नं.328/1, 329/1, 330/1-ए, मौजा दाताळा, साईट नं.124, तह.आणि जि.चंद्रपूर, म्हाडा कडून श्री असलम खान मोहम्मद खान पठाण (कर्जदार/ गहाणदार/ लाभार्थी) आणि श्रीमती आसमा असलम खान पठाण (कर्जदार/गहाणदार/ लाभार्थी) यांना वाटप केलेली जमीन, बिल्ट अप एरिया 44.74 स्के.मि., कारपेट एरिया 38.02 स्के.मि. | रू. 5.11 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 5,94,000/- | रु. 59,400/- |
| # कर्जदार/गहाणदार/लाभार्थी : श्री रवि मारैया आर्नाकोंडा<br>श्रीमती सरीता रवि आर्नाकोंडा<br>शाखा : जटपुरा गेट<br>प्रापर्टी आयडी : BKIDJGRAVI | जागेचा सर्व भाग आणि तुकडा मध्ये जागा आणि बिल्डींग, स्ट्रक्चर्स, शेडस्, फिक्चर्स उभारलेले आणि स्थापित केलेले निवासीय टेनेमेंट नं. (एस-205) /205, बिल्डींग नं.सी 2, दुसरा माळा, म्हाडा अपार्टमेंट, ऑटो कॉलोनी, गुरु साई पॉलीटेक्नीक जवळ, टेनेमेंटस 100/168 येथे स्थित ईडब्लुएस म्हाडा स्कीम, सर्व्हे नं.328/1, 329/1, 330/1-ए, मौजा दाताळा, साईट नं.124, तह. आणि जि.चंद्रपूर, म्हाडा कडून श्री रवि मारैया आर्नाकोंडा (कर्जदार/गहाणदार/लाभार्थी) आणि श्रीमती सरीता रवि आर्नाकोंडा (कर्जदार/गहाणदार/लाभार्थी) यांना वाटप केलेली जमीन बिल्ट अप एरिया 44.74 स्के.मि., कारपेट एरिया 38.02 स्के.मि. | रू. 5.01 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च | भौतिक | रु. 5,94,000/- | रु. 59,400/- |

**बँक ऑफ इंडिया**
नातं बँकिंग पलिकडचं

विभागीय कार्यालय
विदर्भ विभाग
रामनगर, वर्धा-442001

**सोन्याचे दागिने/अलंकार/नाण्यांच्या विक्रीसाठी जाहिर लिलाव सूचना**

याद्वारे खालील सोने तारण कर्जदार, त्यांचे कायदेशीर वारस, सोन्याचे दागिने/अलंकार/नाणी यांच्या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्ती आणि सर्वसामान्यांच्या निदर्शनास आणून दिले जाते की बँकेने वारंवार स्मरणपत्रे/सूचना देऊनही, खालील कर्जदार त्यांच्या बँकेकडे असलेल्या थकबाकीची परतफेड करत नाहीत.

नोटीस प्रसिध्दीद्वारे सूचित करण्यात येत आहे की कर्जदार दिनांक **17.08.2026** पर्यंत त्यांची सर्व देय रक्कम (अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्क/खर्चासह) त्यांच्या संबंधित गोल्ड लोन खात्यात जमा करण्यात अयशस्वी झाल्यास, **दिनांक 18.08.2026 रोजी सकाळी 11.00 पासून दुपारी 03.00 पर्यंत** त्यांनी तारण ठेवलेले सोन्याचे दागिने/अलंकार/नाणी हे on https://egold.auctiontiger.net/ ई लिलावासाठी ठेवली जातील. यासाठी संबंधित कर्जदारांच्या कोणत्याही गैरसोयी, तोटा किंवा नुकसानीसाठी सदर बँक जबाबदार राहणार नाही आणि या संदर्भात कोणत्याही कर्जदाराकडून कोणतेही आरोप आणि निवेदन स्वीकारले जाणार नाही.

अधिक तपशील, प्रक्रिया अनुपालन, अटी आणि नियम डाऊनलोड करण्यासाठी कृपया https://bankofindia.bank.in ला भेट द्या.

| शाखेचे नाव | खातेदाराचे नाव | खाते क्रमांक | एकूण वजन ग्राममध्ये | आरक्षित किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| भद्रावती | श्री जगदीश राजु लवादिया | 961077610001048 | 15.770 | 1,61,973/- |

ठिकाण वर्धा
दि.14-07-2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राह्य मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

**ई-लिलवाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :**

**# सदर मालमत्ता केवळ चंद्रपूर शहरातील ऑटो रिक्षा चालक/मालक यांनाच विकली जाईल. इच्छुक बोलीदाराकडे ऑटो रिक्षाचे वैध नोंदणी प्रमाणपत्र, वैध व्यावसायिक परवाना, (वाहतूक-श्रेणी- ऑटो रिक्षासाठी) वैध सार्वजनिक सेवा बॅज आणि वैध अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल सर्टिफिकेट) असणे आवश्यक आहे.**

1) ई-लिलाव **"जे आहे जेथे आहे, आणि " जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे"** तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.
2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
a) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
टप्पा - 1 : बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव पलॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.
3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा ह्याची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रसिध्द होणे म्हणजे कुणाचिही वचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्यात येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईल बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.
4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन स्वत:ची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : **27.07.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.
5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.
6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.
7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.
8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परतावा करण्यात येईल.
9) बँकांच्या प्रतिकात्मक ताब्यात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालया तर्फे भौतिक ताबा मिळाल्यानंतरच मालमत्तेचा भौतिक ताबा यशस्वी बोलीदाराला सुपूर्द केला जाईल.
10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून ताबडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.
11) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे असे मानले जाईल की बोली लावना-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.
12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्टया सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.
13) यशस्वी बोलीदारांच्या द्वारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-1 ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेजे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, सवैधानिक शुल्क आणि असंवैधानिक शुल्क किंवा देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.
14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.
15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.
16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.
17) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद् केली जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिनेच केल्या आहेत असे मानले जाईल.
18) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

**कर्जदार/जामीनदारांना विक्री सुचना**

**ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2) अंतर्गत कर्जदार/जामीनदारांना (एल/आर.एस.) हयांनी सदर सूचना त्यांना देण्यात आलेली 30 दिवसांची संवैधानिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.**

माननीय महोदय/महोदया,

निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संदर्भात थकीत देणी आणि व्याजासह मासिक दंड, शुल्क आणि भार वगैरे यांचा भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्यावर उपरोक्त नमूद रकमेचा भरणा 60 दिवसांमध्ये करण्यासाठी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करु शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, मागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिका-याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुमच्या लागू असणा-या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा) ईएमडी (रकमेचा भरणा करुन सहभागी होऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 15.07.2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राह्य मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया